द महाराष्ट्र
स्टेट केमिस्टस् ॲन्ड
ड्रगिस्टस् असोशिएशन
THE MAHARASHTRA
STATE CHEMISTS &
DRUGGISTS ASSOCIATION

SERVICE & SECURITY TO PATRONS
MSCDA

OFFICE : 301, Safalya Bldg., 3rd Floor,
Opp. Jaigopal Industrial Estate,
Baburao Parulekar Marg,
Dadar (W.R.), Mumbai - 400 028.
Phone : 2431 0043, 2431 0017
Fax : 022 - 2431 0114
e-mail : info@mscda.in
Affiliated to : AIOCD
All India Organisation of Chemists & Drugists.

संदर्भ : एमएससीडीए/१७०/२०२१ १५नोव्हेंबर २०२१

सर्व मुख्य कार्यकारिणी पदाधिकारी
सर्व झोन कार्यकारिणी पदाधिकारी / अध्यक्ष / सचिव जिल्हा संघटना
महाराष्ट्र राज्य केमिस्टस् ॲण्ड ड्रगिस्टस् असोसिएशन

**विषय : आर्थिक/कायदेशीर/घटनात्मक बाबींचे गांभीर्याने पालन करणेबाबत**

महोदय,

आमच्या असे निदर्शनास आले आहे की, अनेक जिल्हा संघटनामध्ये आवश्यक त्या कायदेशीर बाबींचे योग्यपणे पालन होत नाही. त्याबाबत खालीलप्रमाणे सुचना देण्यात येत आहेत. अशा प्रकारच्या सुचना राज्यसंघटनेने यापुर्वी ही अनेकदा दिलेल्या आहेत.

- प्रत्येक जिल्हा संघटनेने स्वतःच्या जमाखर्चाचे ऑडिट करुन घेणे अत्यावश्यक आहे. तसेच संस्थेचे PAN Card बनवून घेणे व Income Tax च्या दृष्टिने आवश्यक बाबींची पुर्तता कर सल्लागार यांच्या मार्गदर्शनानुसार करावी.
- संघटनेच्यावतीने करण्यात आलेल्या खर्चास नियमितपणे कार्यकारिणी सभा व आमसभेची मान्यता मिळवून घ्यावी.
- कर सल्लागार यांचा सल्ला घेऊन GST मध्ये Registration करुन घ्यावे.
- संस्थेचे Registration केले नसल्यास त्वरित Society ACT व Charity मध्ये संस्थेचे Registration करुन घ्यावे. संस्थेची घटना Memorandum & Articles (MOA) बनवून घ्यावी.
- संस्थेच्या निवडणुका झाल्यानंतर नियमितपणे Change Report नियमाप्रमाणे Charity Commissioner यांचे कार्यालयात दाखल करुन घ्यावा. तसेच Charity Commissioner यांच्याकडे नियमाप्रमाणे कर सल्लागार यांच्या सल्लाने नियमितपणे Audited Balance Sheet ची प्रत दाखल करावी. संस्थेकडील मालमत्तेची नोंद Charity Commissioner यांचे कार्यालयामध्ये करुन घ्यावी.
- संस्थेस काही नवीन स्थावर मालमत्ता खरेदी करावयाची असल्यास राज्य संघटनेची परवानगी घ्यावी तसेच आवश्यक कायदेशीर बाबींची पुर्तता करुनच असा व्यवहार करावा.
- संस्थेकडे असलेल्या स्थावर मालमत्तेची काही कारणाने विक्री करावयाची असल्यास सर्वप्रथम राज्यसंघटनेची परवानगी घ्यावी. त्यानंतर नियमाप्रमाणे आमसभेची मंजुरी तसेच इतर कायदेशीर बाबींचे पालन करुनच असे व्यवहार करावेत. तसेच स्थावर मालमत्ता खरेदी करण्याच्याबाबत ही जिल्हा संघटनेची कार्यकारिणी / आमसभा तसेच राज्यसंघटनेची मान्यता घेऊनच असे व्यवहार करावेत.

याशिवाय इतर आवश्यक त्या कायदेशीर बाबींचे पालन नियमितपणे करित जावे व सदरहू बाब गांभीर्याने घेऊन त्वरित योग्यती कार्यवाही करावी.

कळावे.

आपला नम्र
द महाराष्ट्र राज्य केमिस्ट ॲण्ड ड्रगिस्ट असोसिएशन

अनिल नावंदर
सचिव